

देऊर (ता. कोरेगाव) : अध्यक्ष ॲड. संजीव कदम, सचिव देवेंद्र कदम यांचा सत्कार करताना श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे विश्वस्त. दै.सकाळ,१७/०५/२०२२

# 'मुधाईदेवी'च्या अध्यक्षपदी ॲड. संजीव कदम

**पळशी** : देऊर (ता. कोरेगाव) येथील श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. संजीव कदम यांची एकमताने निवड झाली आहे. कोरेगाव तालुक्यातील अग्रगण्य शिक्षण संस्थांमध्ये श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे नाव आहे. नुकत्याच झालेल्या संस्थेच्या विश्वस्त मंडळाच्या सभेमध्ये एकमताने पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या. ॲड. संजीव कदम हे मुंबई उच्च न्यायालयात प्रख्यात वकील म्हणून सध्या कार्यरत आहेत. त्याचबरोबर ते वेस्टर्न इंडिया बार असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या रूपाने एक उच्च विद्याविभूषित, संयमी,सर्वसमावेशक, पुरोगामी विचारसरणीचे नेतृत्व संस्थेस लाभले आहे, अशा शब्दांत विश्वस्त मंडळाने ॲड. कदम यांना शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या सचिवपदी देवेंद्र कदम यांची फेरनिवड करण्यात आली. या दोन्ही पदाधिकाऱ्यांनी यापूर्वीही श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेच्या नेतृत्वाची धुरा यशस्वीपणे सांभाळली असून, विश्वस्त मंडळाने त्यांना पुन्हा या पदांवर काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचे श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था तसेच परिसरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

दि.०३/०२/२०२१ ते ०७/०२/२०२१



# प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयात NCC प्रवेश प्रक्रिया सुरू

वाठार स्टे : देशाच्या संरक्षणासाठी ग्रामीण भागातील युवकांचे मोठे योगदान आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना एन.सी.सी. च्या माध्यमातून शिस्तीचे व लष्करी व्यवस्था, स्थलसेना, नौसेना व वायुसेना या तीन दलांचे प्रशिक्षण दिले जाते. साहस, जिद्द हे गुण अंगी असणाऱ्या प्रत्येकाला सैन्यदलात चांगल्या संधी उपलब्ध आहेत. सैन्यात भरती होऊन देशाची सेवा करण्याचे अनेक तरुणांचे स्वप्न असते. पण बऱ्याच वेळा शारीरिक क्षमता, गुणवत्ता असूनही केवळ मार्गदर्शनाअभावी सैन्यात भरती होणे सामान्य विद्यार्थ्यांना जमत नाही. म्हणून सक्षम व शक्तीमान सैनिक व अधिकारी घडविणे व त्याचबरोबर आदर्श नागरीक घडवून विद्यार्थ्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास करणे. गणवेशातील विविध सैनिक भरतीपासून अनेक अधिकारी प्रवेशाची माहिती देणे, मार्गदर्शन करणे या दृष्टीने एन.सी.सी. सतत कार्यरत आहे. देऊर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्र सेनेच्या प्रशिक्षणाची जी संधी उपलब्ध झालेली आहे तीचे सोने छात्र विद्यार्थ्यांनी करावे असे आवाहन सातारा जिल्हा एनसीसी २२ महाराष्ट्र बटालियनचे प्रशासन अधिकारी कर्नल पराग गुप्ते यांनी केले. प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर येथे मंजुरी मिळालेल्या एनसीसी युनिटच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयात पहिल्यांदाच राष्ट्रीय छात्र सेनेच्या पहिल्या तुकडीची प्रवेश प्रक्रिया संपन्न झाली.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा पोलीस व सैन्यदलातील भरतीचे असलेले आकर्षण विचारात घेवून महाविद्यालयाने एनसीसी मंजुरीसाठी मागील १५ वर्षे सतत प्रयत्न केले. सातारा जिल्हा एनसीसी २२ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बाळासाहेब काशीद यांच्या विशेष प्रयत्नातून महाविद्यालयाला चालू शैक्षणिक वर्षात १६० एनसीसी छात्र प्रवेशाची मंजुरी मिळाली आहे. यामुळे देऊर पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना देशसेवेची त्याचबरोबर आदर्श नागरिक बनण्याची अतिशय उत्तम संधी उपलब्ध झाली आहे, याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे अवाहन स्वागत समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊरचे चेअरमन श्री धनसिंग कदम यांनी केले.

सैनिकांची मोठी परंपरा असलेल्या व सैनिकांची भूमी म्हणून बिरुदावली भूषविणाऱ्या सातारा जिल्ह्यातील विशेषतः डोंगरी खेडेगावातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सैनिक प्रशिक्षणाची सुविधा मिळावी म्हणून श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेने गेली अनेक वर्षे पाहिलेले स्वप्न व त्यासाठी केलेल्या अविरत प्रयत्न, अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आज एनसीसीच्या रूपाने साकारत आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारत भोसले यांनी केले. महाविद्यालयातून एनसीसी युनिटसाठी व विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल अशी ग्वाही संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्यांनी दिली. श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष श्री अरविंद कदम यांनी एनसीसी शुभारंभ व प्रथम छात्र प्रवेश कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सुभेदार मेजर उदय पवार व सातारा एनसीसी २२ महाराष्ट्र बटालियनचे प्रशिक्षण अधिकारी उपस्थित होते. एनसीसी शुभारंभ व प्रथम छात्र प्रवेश कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालय एनसीसी प्रमुख केअर टेकर प्रा.पांडुरंग पाटील यांनी केले.

# रोटरी क्लब ऑफ सातारा तर्फे देऊरच्या प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयास आदर्श महाविद्यालय पुरस्कार प्रदान




वाठार स्टे.: रोटरी क्लब ऑफ साताराच्या सत्याहत्तराव्या वर्धापदिनानिमित्त कोविड संसर्गाच्या कालावधीत महत्वपूर्णकाम करणाऱ्या देऊरच्या प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा आदर्श महाविद्यालय म्हणून रोटरी तर्फे स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात स्वतः पुढाकार घेवून कोविड विलगिकरण कक्ष निर्माण करून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात एक आदर्श निर्माण केल्याबद्दल प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालयाचा ङ्कसन्मान कार्याचा शुभारंभ पर्वाचाफ्या विशेष समारंभात रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे नियोजित गव्हर्नर रो. रूक्मेश जाखोटिया व रोटरी क्लब सातारा चे अध्यक्ष रो. संदिप भागवत यांचे हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारत भोसले सन्मानपत्र व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

कोविड विलगीकरण कक्षाबरोबरच तसेच या महाविद्यालयाने देऊर पंचक्रोशीतील अनेक गावांचे पालकत्व स्वीकारून महाविद्यालयाच्या माध्यमातून मास्क वाटप, सॅनिटायझर वाटप, धान्य वाटप, कोविड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयक जनजागृती, लसीकरणविषयक जनजागृती अशा अनेकविध उपक्रमांच्या माध्यमातून देऊर परिसरातील कोविड बाधितांची रूग्ण साखळी तोडण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. तसेच या परिसरातील कोवीड रुग्णांना प्रबोधनाच्या माध्यमातून दिलासा देण्याचे कार्य केलेले आहे. कोविड प्रबोधनपर कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व नैतिक मूल्ये रुजविण्याचे महत्वपूर्ण कार्य या महाविद्यालयाने केलेले आहे.या पुरस्कार सोहळ्यास सहाय्यक प्रांतपाल रो. सचिन शेळके, रोटरी क्लब ऑफ सातारा चे उपाध्यक्ष रो. अरविंद कदम, सचिव रो. शशिकांत रसाळ, नियोजित अध्यक्ष रो. शंकरराव कर्पे, कोषाध्यक्ष रो. किशोर डांगे, डॉ.अशोक शेलार, सहा.प्रा.सूर्यकांत अदाटे तसेच रोटरी क्लब ऑफ सातारा चे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. भाग्यश्री शिंदे यांनी केले.

# बांधिलकीच्या भावनेतून देऊर महाविद्यालयात भाऊबीज

**पिंपोडे : पुढारी वृत्तसेवा**

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर येथे राष्ट्रीय सेवा योजना व रोटरी क्लब ऑफ सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने भाऊबीज सण साजरा करण्यात आला. बांधिलकीच्या भावनेतून हा आगळा वेगळा उपक्रम राबवण्यात आला.

या कार्यक्रमाची संकल्पना महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊरचे विश्वस्त अरविंद कदम यांच्या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून साकार झाली. गरीब, गरजू व वंचित समाज गटातील ४३ महिला भगिनींना भाऊबीज म्हणून साडी, मिठाई-दिवाळी फराळ, गुलाबपुष्प व महाविद्यालय



भाऊबीज कार्यक्रमाच्या निमित्ताने ओवाळताना निमंत्रित भगिनी.

नियतकालिक भेट देऊन भाऊबीज साजरी करण्यात आली.

कार्यक्रमासाठी मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे चेअरमन हणमंतराव कदम, संस्थेचे सचिव देवेंद्र कदम जेष्ठ विश्वस्त सर्जेराव कदम, ॲड. संजीव कदम, ॲड. राजेंद्र कदम, रविंद्र कदम, रोटरी क्लब ऑफ साताराचे उपाध्यक्ष इंजिनिअर अरविंद कदम, संस्थेचे सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी ॲड. संजीव कदम यांनी महाविद्यालयाच्या व संस्थेच्या वाटचालीचा आढावा मांडला. रोटरी क्लब ऑफ साताराचे अध्यक्ष संदीप भागवत यांनी प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा भाऊबिज उपक्रम स्तुत्य आहे. या उपक्रमांमध्ये रोटरी क्लब ऑफ सातारा आपले योगदान भविष्यातही देत राहील, अशी ग्वाही दिली. याप्रसंगी पास्ट डिस्ट्रीक्ट गव्हर्नर इस्माईल पटेल, रोटरीयन श्रीकांत निकम, शंकरराव करपे, ॲड. सुनील सांगबले, आकाश शालगर, किशोर डांगे, बन्सीलाल शेठ, उद्योजिका सौ. दिपाली भागवत, उद्योजिका सौ. प्राजक्ता कदम, सुरेश जाधव उपस्थित होते.


**जाहिर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः कसबे मलकापुर ता. कराड जि. सातारा पंचक्रोशितील सर्वांना या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की,

कसबे मलकापुर ता. कराड जि. सातारा हद्दीतील गट क्र. व उपविभाग क्र. २०७/१/ड क्षेत्र ०० हे. २० आर आकार ०१रू – ९८ पैकी निलोफर आसिफ तांबोळी व आसिफ इब्राहिम तांबोळी यांचा हिस्सा ०० हे ०३ आर ही मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस– श्री. राजेंद्र महादेव घोडके यांची मिळकत, दक्षिणेस– रविंद्र


दै.पुढारी, दि. १०/११/२०२१

4G G 0.1K/s ··· 10:17 PM 42%

a6760a71-cee4-4c28-9...

Rotate screen Play Thumbnail Enter Browser

# साप्ताहिक सातारा समाचार दि.३०/०३/२०२२ ते ०५/०४/२०२२



## प्रा.संभाजीराव कदम महाविद्याची जलसंधारण चळवळ अभिमानास्पद:संजीवराजे

### तडवळे येथे राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**देऊर**:प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊरचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तडवळे येथे श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात




आलेले आहे. या शिबिराचा उद्घाटन समारंभ श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, माजी अध्यक्ष जिल्हा परिषद सातारा यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. उद्घाटनप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, उत्तर कोरेगाव हा कायमच दुष्काळी राहिलेला आहे. या भागात जलसंवर्धनाची कामे मोठ्याप्रमाणात होण्याची आवश्यकता आहे. याभागातील पाण्याचा थेंब-थेब अडविणे महाविद्यालयाच्या माध्यमातून खूप आदर्शवत कार्य होत आहे. महाविद्यालयाने दत्तक खेड्यांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग, रुफ वॉटर हार्वेस्टिंग, बोअरवेल रिचार्ज अशा स्तुत्य उपक्रमांद्वारे आदर्शवत कार्य केले आहे. या श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून ङ्गमाजी वसुंधरा अभियानफ या ब्रीद वाक्यासह तडवळे गावामध्ये अशाच प्रकारचे आदर्शवत कार्य संस्कार रूपाने होईल आणि हे गाव त्याचा वसा पुढे चालवेल अशी अशा आहे.

उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना तडवळे गावचे माजी वाढविल्याचे सांगून येणाऱ्या वर्षभरात ५० हजार झाडे लावून ती जोपासण्याचा संकल्प बोलून दाखविला. यावेळी सरपंच नाना बढेकर यांनीही मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयाच्या जलसंवर्धनाच्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे सचिव देवेंद्र कदम यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ.अशोक शेलार यांनी केले, शिबीर उद्घाटनासाठी दहीगावचे श्री भरत चव्हाण, मुख्याध्यापक संजय लेंभे, उद्योजक संतोष कारंडे, प्रवीण भोईटे, ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एस.एस.पोटभरे यांनी केले आणि आभार डॉ.डी.जे.ओवाळे यांनी व्यक्त

gramodharstr@gmail.com

दैनिक ग्रामोध्दार दि. ०४/०७/२०२२

# आयात निर्यात व्यवस्थापन परीक्षेत प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचे यश

## इनोव्हेटिव्ह इंजीनियरिंग सातारा कंपनीचे. इंजि. अरविंद कदम यांचा आदर्श उपक्रम

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वाठार स्टे :** श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था संचलित, प्रा संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर या ठिकाणी पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व दिले जाते. स्वतःच्या पायावर उभे राहायचे असेल तर आजच्या काळात व्यवसायिक शिक्षणाशिवाय विद्यार्थ्यांना पर्याय नाही. याच विचाराने प्रेरित झालेले महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. इंजि. अरविंदजी कदम साहेब यांच्या अथक प्रयत्नाने व प्रेरणेने महाविद्यालयात त्यांच्या इनोव्हेटिव्ह इंजीनियरिंग सातारा च्या सहकार्याने Professional Skills Development Programme on International Trade (Export-Import Management) and GST Law Operational Procedures Practices हे दोन प्रोफेशनल प्रोग्राम सुरू केलेले आहेत. दोन्ही प्रोग्रामचा अभ्यासक्रम त्यांनी स्वत: डिझाइन केलेला आहे. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी सदर दोन्ही प्रोग्राम ची पुस्तके स्वत: तयार केलेली आहे. वरील दोन्ही प्रोग्राम सुरु करणारे प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिलेच महाविद्यालय ठरले आहे. यावेळी वरील प्रमाणे दोन्ही अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. इंजि. कदम साहेब यांनी घेतलेल्या परिश्रमाचे बद्दल संस्था चेअरमन अँड्. संजीव कदम व संस्था विश्वस्त मंडळ यांनी अभिनंदन केले.

देऊर महाविद्यालयाने सुरू केलेल्या Professional Skills Development Programme on International Trade (Export-Import Management) च्या विद्यार्थीनी भारतीय विदेश व्यापार संस्थान(IIFT), DGFT व वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार च्या निर्यात बंधू योजनेअंतर्गतफ घेतल्या गेलेल्या Skills for Export-Import Management' या परीक्षेत घवघवीत यश मिळवले. या परीक्षेमध्ये १) प्रा. डॉ. एस. एस. पोटभरे २) धीरज ज्ञानेश्वर देशमुख बीए भाग -३ (मराठी विषय) ३) रोहन सुनील भोईटे विभाग- ३ (हिंदी विषय) हे उच्च श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन अँड्. संजीव कदम संस्थेचे सचिव, श्री देवेंद्र कदम महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. इंजि. अरविंदजी कदम, सर्व संस्था विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले, सर्व सहकारी स्टाफ व विद्यार्थी यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

दै. पुढारी, दि.१२/०७/२०२२



हर्षल पवार व डॉ. दत्तात्रय ओवाळ यांना पुरस्कार वितरण करताना अरविंद कदम, राजेंद्र मोहिते, संजीव कदम व इतर.

# इनोव्हेशन व डेडीकेशन अॅवॉर्डमुळे नवीन संशोधनाला प्रोत्साहन : अरविंद कदम

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

प्रा. संभजीराव कदम महाविद्यालयामध्ये काळाची पावले ओळखून स्कील डेव्हल्पमेंटसाठी प्रोफेशनल प्रोग्रॅममध्ये इंटरनॅशनल ट्रेड आणि जीएसटी लॉ हे विद्यार्थ्यांना व्यावसायाभिमुख व रोजगाराभिमुख बनवणारे अभ्यासक्रम सुरु केले आहेत. बेस्ट इनोव्हेटिव्ह टीचर्स व डेडीकेटेड टीचर्स अॅवॉर्डमुळे संशोधकांना प्रोत्साहन मिळणार आहे, असे प्रतिपादन मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे विश्वस्त व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अरविंद कदम यांनी केले.

प्रा. संभजीराव कदम महाविद्यालय येथील आयोजित कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. दरम्यान, ग्रंथपाल हर्षल पवार यांना बेस्ट इनोव्हेटिव्ह टीचर्ड अॅवॉर्डने तर डॉ. दत्तात्रय ओवाळे यांना बेस्ट डेडीकेटेड टीचर्स अॅवॉर्ड देण्यात आला. तसेच डॉ. एस. एस. पोटभरे, श्रीमती अंकिता निकम यांना सन्मानित करण्यात आले. विद्यापीठाची पीएचडी मिळणाऱ्या तसेच स्कील फॉर एक्स्पोर्ट इम्पोर्ट मॅनेजमेंट परीक्षेतील यशस्वीतांचा गौरव करण्यात आला. यावेळी मासचे अध्यक्ष राजेंद्र मोहिते, सचिव धैर्यशील भोसले, मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे चेअरमन संजीव कदम, सचिव देवेंद्र कदम, विश्वस्त सर्जेराव कदम, मेजर समीर चव्हाण, शालेय समिती अध्यक्ष अॅड. विजयराव चव्हाण, भिमराव पवार, बी. आर. चव्हाण, प्राचार्य डॉ. भारत भोसले, मुधाईदेवी विद्यामंदिरचे नितीन भंडारी उपस्थित होते.

# महाबळेश्वरमध ग्लेन ओगल ध

**महाबळेश्वर : पुढारी वृत्तसेवा**

महाबळेश्वर तालुक्यात पावसाची संततधार कायम असून गेल्या आठ ते दहा दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे येथील ग्लेनओगल धरण पूर्ण क्षमतेने भरले. वेण्णा तलावाच्या पाणीपातळीत देखील मोठी वाढ झाली आहे.

महाबळेश्वर तालुक्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर

सकाळ

# देऊर परिसरात आज दुचाकी रॅलीचे आयोजन

## कदम महाविद्यालय, सकाळ 'यिन'तर्फे उपक्रम

**सातारा, ता. ११ :** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय देऊर आणि सकाळ माध्यम समूहाचे यंग इन्स्पिरेटर नेटवर्क यांच्या वतीने घरोघरी तिरंगा व हुतात्मा जवान अभिवादन फेरी उद्या (ता.१२) रोजी सकाळी आठ वाजता देऊर येथे आयोजित केली आहे. या मोटारसायकल रॅलीचा शुभारंभ 'सकाळ'चे सहयोगी संपादक राजेश सोळसकर व वरिष्ठ व्यवस्थापक राजेश निंबाळकर यांच्या हस्ते होणार आहे.

ही तिरंगा रॅली देऊर येथून दहिगाव, वाघोली, तडवळे संमत, वाठार स्टेशन, पळशी, परतवडी, नांदगिरी, शिवथर, आंबवडे या मार्गावरून पुन्हा महाविद्यालय अशी होणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले, एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक शेलार आणि एनसीसीचे समन्वयक पांडुरंग पाटील यांनी याबाबत माहिती दिली.

रॅलीसाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या उपक्रमांतर्गत स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त घरोघरी तिरंगाचा प्रचार, प्रसार केला जाईल.

Satara, Satara-Today
12/08/2022 Page No. 3

सकाळ

सातारा, शनिवार, १३ ऑगस्ट २०२२ २

# हर घर तिरंगाचा देऊर भागात नारा

## दुचाकी रॅली; प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय आणि 'सकाळ यिन'चा उपक्रम

YOUNG INSPIRATORS NETWORK

Inspire. Network. Deliver

**पळशी, ता. १२ :** देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त देऊर (ता. कोरेगाव) येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय आणि सकाळ माध्यम समूहाचे यंग इन्स्पिरेटर नेटवर्क यांच्या वतीने घरोघरी तिरंगा व हुतात्मा जवान अभिवादन यानिमित्ताने आज दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले.

'सकाळ'चे सहयोगी संपादक राजेश सोळसकर, वरिष्ठ व्यवस्थापक राजेश निंबाळकर, सरपंच शामराव कदम यांच्या हस्ते देऊर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर दुचाकी रॅलीस प्रारंभ झाला. या वेळी यिन अधिकारी अजिंक्य शेवाळे, यिन पर्यटनमंत्री हरिष ढाणे, यिन विद्यार्थी प्रतिनिधी रोहन देशमुख, 'सकाळ'चे बातमीदार राजेंद्र वाघ, प्राचार्य डॉ. भारत भोसले, 'एनएसएस'चे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक शेलार, प्रा. सूर्यकांत अदाटे, डॉ. कमलसिंग क्षत्रिय, डॉ. संध्या पौडमल, एनसीसी समन्वयक प्रा. पांडुरंग पाटील, प्रा. डॉ. डी. बी. शेडगे, डॉ. डी. जे. ओवाळे, क्रीडा विभागप्रमुख तानाजी साबळे, डॉ. प्रसन्नकुमार पाटील, डॉ. शिवाजी चवरे, डॉ. सुंदर पोटभरे, डॉ. उत्तम आळतेकर, संतोष कदम, रणजित कदम, कुंडलिक कदम, दत्तात्रेय खराडे, ग्रामपंचायतीच्या सदस्या सौ. देशमुख, ज्युनिअर कॉलेजचे प्रा. पवार, प्रा. सचिन दाहोत्रे, प्रा. एल. जी. थोरात, प्रा. नंदकुमार शेडगे, एनएसएस व एनसीसीचे स्वयंसेवक उपस्थित होते. देऊर येथून निघालेली दुचाकी रॅली दहिगाव, घिगेवाडी, वाघोली, पिंपोडे बुद्रुक, तडवळे (संमत वाघोली), वाठार, तळिये, बिचुकले, पळशी, कोलवडी, परतवडी, नांदगिरी, सातारारोड, भीमनगर, दरे, शिवथर या मार्गाने गेली. शहीद जवान स्मारक वाघोली भोईटे, तडवळे (संमत वाघोली) चंद्रकांत बळिराम भोईटे, परतवडी दिसले, नांदगिरी भगवान शंकर वाघ, शिवथर विशाल हनुमंत साबळे यांच्या प्रती कृतज्ञता व अभिवादन आणि वीर पत्नीस अभिवादन करण्यात आले. दरम्यान, प्रत्येक ग्रामपंचायतीच्या वतीने तेथील सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी रॅलीचे स्वागत केले. सामाजिक वनीकरण विभागाचे श्री. काळे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना वृक्षारोपणासाठी रोपे भेट देण्यात आली. पिंपोडे बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज सहकारी पतसंस्था आणि सातारारोड येथील माजी विद्यार्थी रत्नदीप फाळके यांनी अल्पोपाहाराची सोय केली होती. देऊर येथे रॅलीचा समारोप झाला.



देऊर (ता. कोरेगाव) : दुचाकी रॅलीचा प्रारंभ करताना राजेश सोळसकर, राजेश निंबाळकर, शामराव कदम, अजिंक्य शेवाळे, हरिष ढाणे, रोहन देशमुख, राजेंद्र वाघ आदी.

साप्ताहिक सातारा समाचार

देऊर येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयात NCC प्रशिक्षण सुरु

http://saptahiksatarasamachar.com

सातारा समाचार ऑनलाइन न्यूज पोर्टल

देऊर महाविद्यालयात जागतिक महिलादिनी कर्तुत्ववान महिलांचा मानपत्र देऊन सन्मान

http://satarasamachar.com

सातारा समाचार ऑनलाइन न्यूज पोर्टल

देऊर येथे कोरोना विलीगीकरण कक्षाचे उद्घाटन

http://satarasamachar.com

ध्दार www.gramodharnews.com जिल्हा

दै. ग्रामोध्दारदि.१५/११/२०२२

# प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर येथे खो-खो स्पर्धा संपन्न

## कोल्हापूर अंतरविभगिय स्पर्धेत फलटण येथील मुधोजी महाविद्यालय प्रथम

ग्रामोध्दार वृत्तसेवा

वाठार स्टे : देऊर, प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर येथे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आंतरविभागीय मुलांच्या खो-खो क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धांचे उद्घाटन श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे माजी सचिव श्री हणमंतराव कदम यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेवून आपल्या क्रीडा गुणांच्या नैपुण्याने घवघवीत यश मिळवावे. क्रीडा स्पर्धांमधील राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय क्रीडापटूंसाठी खूप चांगल्या संधी उपलब्ध आहेत, याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्यात सांघिक भावना वाढीस लागतात. परस्परांमध्ये प्रेम, आपुलकीची भावना वाढीस लागते. असे



प्रतिपादन श्री हणमंतराव कदम यांनी उद्घाटनप्रसंगी केले. खो-खो क्रीडास्पर्धा उद्घाटन प्रसंगी संस्थेचे विश्वस्त श्री राजेंद्र कदम, श्री मुधाईदेवी विद्यामंदिराचे प्राचार्य श्री नितीन भंडारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारत भोसले उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आंतरविभागीय मुलांच्या खो-खो क्रीडा स्पर्धेसाठी सातारा जिल्ह्यातील विविध १८ महाविद्यालयातील संघ सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये मुधोजी महाविद्यालय, फलटण प्रथम क्रमांक, सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर द्वितीय क्रमांक, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सातारा तृतीय क्रमांक व वेणूताई चव्हाण महाविद्यालय, कराड चतुर्थ क्रमांक पटकावला. खो-खो क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भारत भोसले आणि डॉ. ओझर्डे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. महाविद्यालयाच्या वतीने क्रीडा स्पर्धा आयोजन महाविद्यालयाचे शारीरिक संचालक श्री तानाजी साबळे यांनी केले. क्रीडा स्पर्धा यशस्वीरीत्या संपन्न होण्यासाठी श्री मुधाईदेवी विद्यामंदिराचे शिक्षक श्री तानाजी कदम, श्री मनेश धुमाळ आणि श्री काटकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

Public APP satarasamachar1

कोरेगाव: देऊर येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा शिवाजी विद्यापीठ स्तरावर गौरव

https://link.public.app/FL2gi

Public APP satarasamachar1

आयात निर्यात व्यवस्थापन परीक्षेत प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचे यश

http://saptahiksatarasamachar.com/?p=14672

दै. पुढारी, दि.२९/११/२०२२



देऊर महाविद्यालयात संविधान दिन कार्यक्रमात बोलताना नायब तहसीलदार सारिका शिंदे, व्यासपीठावर मान्यवर.

# देऊर महाविद्यालयात संविधान दिन

**पिंपोडे बुद्रुक : पुढारी वृत्तसेवा**

देऊर ता. कोरेगाव येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, समानसंधी केंद्र, राज्यशास्त्र विभाग आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सांप्रदायिक सदभावना दिवस व संविधान दिनाच्या निमित्ताने 'संविधान आणि आपण' हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी कोरेगावच्या नायब तहसीलदार सारिका शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी भारतीय संविधानाचे पूजन करण्यात आले तसेच देऊरमध्ये संविधान जनजागृती रॅली, नशामुक्त भारत रॅली आणि मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले. नशामुक्त भारतासाठी सार्वजनिक शपथ ग्रहण करण्यात आली. ग्रंथालय विभागाने संविधान दिनानिमित्ताने विविध भाषांमधील भारतीय संविधानाचे ऑनलाईन प्रदर्शन केले. त्यास विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

संविधान आणि आपण'या विषयावर सारिका शिंदे यांचे व्याख्यान पार पडले. भारतीय संविधान हे भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा असून त्याचा सर्वांनी आदर केला पाहिजे, असे सारिका शिंदे यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. भारत भोसले यांनी प्रास्तविक केले. यावेळी देऊरचे सरपंच शामराव कदम, तलाठी ए. एम. शिंदे, पिंपोडे खुर्दचे तलाठी जे. एम. मोमीन, पर्यवेक्षक जाधव, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सूर्यकांत अदाटे यांनी केले. आभार प्रा. पांडुरंग पाटील यांनी मानले.

# मुधोजी महाविद्यालयाने पटकावला प्रथम क्रमांक

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय खो-खो स्पर्धा

**पळशी, ता. १४ :** देऊर (ता. कोरेगाव) येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयामध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय मुलांच्या खो-खो क्रीडा स्पर्धेत फलटण येथील मुधोजी महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

रहिमतपूर येथील सरदार बाबासाहेब माने महाविद्यालयाच्या संघाने दुसरा, सातारा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या संघाने तिसरा व कऱ्हाड येथील वेणूताई चव्हाण महाविद्यालयाच्या संघाने चौथा क्रमांक मिळविला.

जिल्ह्यातील विविध १८ महाविद्यालयांतील संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे माजी सचिव हणमंतराव कदम यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‍घाटन झाले. ते म्हणाले, 'क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना वाढीस लागतात. परस्परांमध्ये प्रेम, आपुलकीची भावना वाढीस लागते. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन नैपुण्य दाखवत घवघवीत यश मिळवावे. क्रीडा स्पर्धांमधील राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय क्रीडापटूंसाठी खूप चांगल्या संधी उपलब्ध आहेत, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा.'

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त राजेंद्र कदम, श्री मुधाईदेवी विद्यामंदिराचे प्राचार्य नितीन भंडारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने तानाजी साबळे यांनी स्पर्धेचे आयोजन केले. प्राचार्य डॉ. भारत भोसले आणि डॉ. ओझर्डे यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.



देऊर (ता. कोरेगाव) : प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयामध्ये झालेल्या खो-खो स्पर्धेतील एक क्षण.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी श्री मुधाईदेवी विद्यामंदिराचे शिक्षक तानाजी कदम, मनेश धुमाळ, श्री. काटकर यांनी सहकार्य केले.

दै. सकाळ, दि. १५/११/२०२२

दै.पुढारी, दि. ०४/१२/२०२२

# प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा विद्यापीठ स्तरावर गौरव

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**

देऊर येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयाचा शिवाजी विद्यापीठ स्तरावर गौरव झाला आहे. या महाविद्यालयातील आय. क्यू. ए. सी. समन्वयक व इंग्रजी विभागप्रमुख डॉ. मनोज गुजर यांची शिवाजी विद्यापीठाच्या निवडणुकीत अधिसभा सदस्य म्हणून सलग दुसऱ्यांदा निवड झाली आहे. 'गुणवंत प्रशासकीय सेवक पुरस्कार २०२२' महाविद्यालयातील प्रशासकीय सेवक दत्तात्रय खराडे यांना प्रदान करण्यात आला आहे.



डॉ. मनोज गुजर यांचा सत्कार करताना राजेंद्र मोहिते, अरविंद कदम व इतर.

डॉ. मनोज गुजर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटमध्ये यापूर्वी प्रभावी अधिसभा सदस्य म्हणून काम केले आहे. दत्तात्रय खराडे यांनी महाविद्यालयात प्रामाणिकपणे सेवा केल्याबद्दल विद्यापीठाने सन्मान केला. दरम्यान, डॉ. मनोज गुजर यांचा सत्कार मासचे अध्यक्ष राजेंद्र मोहिते व संस्था विश्वस्त अरविंद कदम यांनी तर दत्तात्रय खराडे यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले व डॉ. डी. के. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. शंकरराव कर्पे, प्रा. पंकज गांधी, मयूर गांधी, उद्योजक नवनाथ कवडे, रवींद्र खतरी उपस्थित होते.


ॲड. सुनिता एच. घाडगे

जाहीर नोटीस

सातारा येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग १ सो, यांचे कोर्टात.. नेमली तारीख २/१/२०२३.

फौ. कि. न्या. नं. १३८ /२०२२ नि. ४

श्री. गुजाबा कोंडीबा मोरे वय वर्ष ५०, धंदा – शेती रा. मोरेवाडी, पो. बोपोशी ता. जि. सातारा......अर्जदार

विरुध्द

ग्रामसेवक, ग्रामपंचायत परळी, ता. जि. सातारा........सामनेवाला

लोकमत




देऊर ता. कोरेगाव येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना नायब तहसीलदार सारिका शिंदे आदी.

# भारतीय संविधान स्वातंत्र्याचा जाहीरनामा

## सारिका शिंदे : देऊरला संविधान दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपोडे बुद्रुक : 'भारतीय संविधान हे भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा असून, सर्वांनी त्याचा आदर केला पाहिजे,' असे प्रतिपादन कोरेगावच्या नायब तहसीलदार सारिका शिंदे यांनी केले.

देऊर, ता. कोरेगाव येथील प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, समानसंधी केंद्र, राज्यशास्त्र विभाग आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सद्‌भावना दिवस व संविधान दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोरेगावच्या नायब तहसीलदार सारिका शिंदे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. देऊर गावामध्ये संविधान जनजागृती रॅली, नशामुक्त भारत रॅली आणि मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने संविधान दिनाच्या निमित्ताने विविध भाषांमधील भारतीय संविधानाचे ऑनलाइन प्रदर्शन केले.

प्राचार्य डॉ. भारत भोसले यांनी प्रास्ताविकाचे वाचन केले. कार्यक्रमास श्यामराव कदम, तलाठी ए. एम. शिंदे, जे. एम. मोमीन, पर्यवेक्षक जाधव, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना यामधील सर्व विद्यार्थी, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सांजवात

# स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी कायमच सकारात्मक रहावे : दत्तात्रय गुरव

**सातारा,** दि. १० : विद्यार्थ्यांनी आपली पात्रता आणि मर्यादा प्रत्येकानं ओळखली पाहिजे. अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या तयारीने अशाश्वत ध्येयाच्या दिशेनं त्यांची वाटचाल सुरू होते. स्पर्धा परीक्षेबाबत सध्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड संदिग्धता आहे. 'जागा कमी अन् जीवघेणी स्पर्धा जास्त' अशी स्थिती होते. घरची जबाबदारी,सतत भासणारी आर्थिक चणचण, वाढते वय, यशाची खात्री नाही, कमी दर्जाचे काम करण्याची नसलेली मानसिकता, मुलींच्या बाबतीत घरातून लग्नासाठी होत असलेली घाई. त्यातून मुलींमध्ये वाढत जाणारा तणाव या सर्व 'नकारात्मक बाजू' स्पर्धा परीक्षेच्या कृत्रिम वातावरणातून जन्म घेतात. त्यामुळे बऱ्याचदा निराशा पदरात



**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दत्तात्रय गुरव, व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ.भारत भोसले, निलेश गायकवाड.**

पडते. विद्यार्थी आणि पालकांनीसुद्धा त्याकडे गांभीर्याने पहिले पाहिजे. असे प्रतिपादनभुईंजचे सहाय्यक पोलीस महामार्ग निरीक्षक दत्तात्रय गुरव यांनी केले.

प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊरमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, प्लेसमेंट सेल व समान संधी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पर्धा परीक्षा व विविध पदभरती' या विषयावर मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी गुरव बोलत होते.

गुरव यांनी पुढे आपल्या मार्गदर्शनामध्ये स्पर्धा परीक्षा काळाची गरज आहे. स्पर्धा परीक्षेतून मुलांचे व्यक्तीमत्त्व घडते असे नमुद केले. विविध स्पर्धा परीक्षांमधून विविध पदांची भरती होत असते. अलीकडच्या काळात महाराष्ट्र सरकारने विविध जिल्हयांची पोलीस भरती सुरू केलेली आहे. त्या सर्व स्पर्धा परीक्षांचा अभ्यास कसा करावा हेही त्यांनी सविस्तर स्पष्ट केले. त्याच बरोबर रस्ता सुरक्षा अभियांनाअंतर्गत 'रस्ता सुरक्षा जिवन रक्षा' या विषयांवरही त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला त्यांचे सहकारी पोलीस नाईक मा. श्री. निलेश गायकवाड, महामार्ग पोलीस केंद्र भुईंज उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यकमाचे प्रास्तावीक डॉ. एस.एस. पोटभरे यांनी केले. सुत्रसंचालन सहा. प्रा. सुर्यकांत अदाटे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सहा. प्रा. अंकीता निकम यांनी मानले.

Main Edition
Dec 11, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

दै. सातारा न्यूज, दि.११/१२/२०२२

# स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी कायमच सकारात्मक रहावे - दत्तात्रय गुरव



**सातारा न्यूज; वाठार स्टे. :** प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊरमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, प्लेसमेंट सेल व समान संधी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पर्धा परीक्षा व विविध पदभरती' या विषयावर मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सहा. पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय गुरव महामार्ग पोलीस केंद्र, भुईंज उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपली पात्रता आणि मर्यादा प्रत्येकानं ओळखली पाहिजे. अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या तयारीने अशाश्वत ध्येयाच्या दिशेनं त्यांची वाटचाल सुरू होते. स्पर्धा परीक्षेबाबत सध्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड संदिग्धता आहे. 'जागा कमी अन् जीवघेणी स्पर्धा जास्त' अशी स्थिती होते. घरची जबाबदारी,सतत भासणारी आर्थिक चणचण, वाढते वय, यशाची खात्री नाही, कमी दर्जाचे काम करण्याची नसलेली मानसिकता, मुलींच्या बाबतीत घरातून लग्नासाठी होत असलेली घाई. त्यातून मुलींमध्ये वाढत जाणारा तणाव या सर्व 'नकारात्मक बाजू' स्पर्धा परीक्षेच्या कृत्रिम वातावरणातून जन्म घेतात. त्यामुळे बऱ्याचदा निराशा पदरात पडते. विद्यार्थी आणि पालकांनीसुद्धा त्याकडे गांभीर्याने पहिले पाहिजे. असे प्रतिपादन श्री दत्तात्रय गुरव यांनी केले.

त्यांनी पुढे आपल्या मार्गदर्शनामध्ये स्पर्धा परीक्षा काळाची गरज आहे. स्पर्धा परीक्षेतून मुलांचे व्यक्तीमत्त्व घडते असे नमुद केले. विविध स्पर्धा परीक्षांमधून विविध पदांची भरती होत असते. अलीकडच्या काळात महाराष्ट्र सरकारने विविध जिल्हयांची पोलीस भरती सुरू केलेली आहे. त्या सर्व स्पर्धा परीक्षांचा अभ्यास कसा करावा हेही त्यांनी सविस्तर स्पष्ट केले. त्याच बरोबर रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत 'रस्ता सुरक्षा जिवन रक्षा' या विषयांवरही त्यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला त्यांचे सहकारी पोलीस नाईक मा. श्री. निलेश गायकवाड, महामार्ग पोलीस केंद्र भुईंज उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत भोसले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यकमाचे प्रास्तावीक डॉ. एस.एस. पोटभरे यांनी केले. सुत्रसंचालन सहा. प्रा. सुर्यकांत अदाटे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सहा. प्रा. अंकीता निकम यांनी मानले.